महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल: cetcell@mahacet.org

क्र.आस्था-१९ १९/प्र.क्र०१/ जाहिर नोटिस- सुटटीच्या दिवशी कार्यालय सुरु ठेवण्याबाबत/२५०५/२०२५ दिनांक- 31 JUL 2025

## जाहीर नोटिस

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांच्या मार्फत व्यावसायिक अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु आहे. यासाठी महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी "प्रवेश" घेण्यासाठी सार्वजनिक सुटटी दिवशी देखील जाणार आहेत. त्या अनुषंगाने विद्यार्थी प्रवेश मदत व मार्गदर्शन यासाठी सर्व शैक्षणिक संस्थांनी सामाईक परीक्षा कक्षाने निर्धारित केलेल्या वेळापत्रकानुसार प्रवेश निश्चिती व अनुषंगिक कामे विहित वेळेत पार पाडावीत.

विद्यार्थ्यांना आवश्यक मदत व मार्गदर्शन मिळावे यासाठी सर्व संस्थांनी (महाविद्यालये/विद्यापीठे) शनिवार, रविवार व तसेच प्रवेश प्रक्रिया चालू असलेल्या सुट्ट्यांचे दिवशीही आपले प्रवेश संबंधित शैक्षणिक कार्यालये सुरू ठेवावीत. यामुळे विद्यार्थी व पालक यांना प्रवेशाबाबत आवश्यक ती माहिती, कागदपत्र पडताळणी, अडचणींचे निराकरण इत्यादी कामे वेळेत पूर्ण करता येतील.

सर्व संबंधित संस्थांनी हे आदेश तात्काळ अंमलात आणून, विद्यार्थ्यांच्या सोयीसाठी प्रवेश कार्यालय (महाविद्यालये/विद्यापीठे) सुरू ठेवण्याची दक्षता घ्यावी.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष ,
मुंबई